# मालेगांव महानगरपालिका,मालेगांव
## उद्यान विभाग
### कोटेशन सुचना क्र.      /2025-2026

आयुक्त, मालेगांव महानगरपालिका मालेगाव यांद्वारे महापालिका कार्यक्षेत्रातील परीसरामध्ये वादळ, वा-याने अथवा नैसर्गिक कारणांनी उन्मळुन पडलेले वृक्ष अथवा वृक्षाच्या फांद्या कापने/तोडने व वाहतुक करावयाच्या व इतर स्वरुपाचे काम करणेकामी इच्छुक असलेले उमेदवार/मक्तेदार/संस्था यांचे कडुन लाकूड फाटयाच्या बदल्यात प्रति किलो प्रमाणेचे दर मागवित आहेत.

| अ.नं. | कोटेशन तपशिल | |
|---|---|---|
| | कामाचे नाव | मालेगांव महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वादळवाऱ्याने किंवा नैसर्गिक कारणांनी उन्मळुन पडलेली झाडे उचलुन वाहुन नेणे,तसेच रस्त्यातील उभी असलेली धोकेदायक फांदयाचा विस्तार व वाळलेली धोकेदायक किडग्रस्त  झाडे तोडणे व उचलुन नेणे. |
| | कामाची मुदत | कार्यादेश दिल्यापासुन 31 मार्च 2021 पावेतो |
| | कोरे कोटेशन फॉर्म विक्री | दिनांक 12 /09 /2025 सकाळी 11:05 ते दिनांक 18 /09 /2025 दुपारी 4:00 वाजे पर्यंत. |
| | कोटेशन फॉर्म स्विकारण्याचा कालावधी | दिनांक 12 /09 /2025 सकाळी 11:00 ते दिनांक 18 /09 /2025 दुपारी 4:00 वाजे पर्यंत. |
| | कोटेशन उघडण्याचा कालावधी | दि. 19 /09 /2025 रोजी संध्याकाळी 12.30 वाजे नंतर (शक्य झाल्यास) |
| | बयाणा रक्कम | रुपये- 5000/- |
| | कोटेशन फॉर्म फी | रुपये- 500/- |
| | बयाणा रक्कम भरण्याची पध्दत | कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी रोखीने दि.   /   /2025 ते दि.  /   /2025 सकाळी 11 ते दुपारी 04:00 या वेळेत रोख बयाणा स्विकारली जाईल बयाणा रोख न भरता पाकिट क्र.01 मध्ये तेवढया रकमेचा डी.डी. टाकुन ही भरता येईल. |
| | निविदा वैधता कालावधी | 3 महीने |

| अ.नं. | कोटेशन अर्हता |
|---|---|
| 1 | पॅन कार्डच्या सांक्षाकीत प्रत |
| 2. | आधार कार्ड सत्य प्रत |
| 3 | संस्था नोंदणी प्रमाणपत्र |
| 4 | दि.   /   /2025 ते दि.   /   /2025 या कालावधीत रोख बयाणा रक्कम भरल्याची पावती अथवा तेवढया रकमेचा डी.डी.ची साक्षांकीत प्रत . |

**अटी व शर्ती-**

**निविदा/कोटेशन सादर करण्याची पध्दत-**

1) निविदा/कोटेशन सादर करतांना दोन लिफाफा पद्धतीने सादर करणेत यावेत. लिफाफा क्र.01 मध्ये -रकाना निविदा अर्हता मधिल कागदपत्रे सादर करावित. लिफाफा क्र.02 मध्ये कोटेशन फॉर्म सादर करतांना त्यांमध्ये निविदेतील कामासाठी सादर करण्यात येणारे दर रक्कम रुपये प्रति किलो या प्रमाणे अंकी व अक्षरी ठळक अक्षरामध्ये लिहिण्यात यावे.



Scanned with OKEN Scanner

**निविदा अनर्हता-**

१) निविदा अर्हतेसाठी ठरविण्यात आलेल्या कागदपत्रांपैकी कोणतेही एक किंवा एकापेक्षा जास्त कागदपत्रे लिफाफा क्र.01 मध्ये सादर करणेस असमर्थ ठरल्यास सदर निविदा पुढील प्रक्रियेसाठी बाद ठरविण्यात येईल.

२) निविदा सादर करणारे निविदाकार/ संस्था कोणत्याही शासकीय कार्यालयाकडील काळया यादीत समावेश असल्याचे कोणत्याही वेळेस आढळुन आल्यास अशा मक्तेदारांने सादर केलेली निविदा बाद ठरविण्यात येईल.

**दंड व शास्ती -**

३) सदरचे कामामध्ये कचुराई केल्यास संबंधित मक्तेदारास खालीलप्रमाणे दंड तरतुद बाध्य राहील.

| अ.क्र. | तपशिल | मुदत | मुदतीत काम न केल्यास आकरण्यात येणारा दंड |
|---|---|---|---|
| 1 | तोडलेल्या वृक्षांचा लाकुड फाटा व पालापाचोळा उचलणे | 24 तास | रुपये-200/- |
| 2 | तक्रार निवारण | 24 तास | रुपये-500/- |

**वाद व निपटारा-**

४) निविदेत संबंधि अथवा कामासंबंधी अथवा इतर सलग्न कोणत्याही बाबीच्या अनुषंगाने वाद निर्माण झाल्यास त्याचा निपटारा करणेकामी मा. आयुक्त मालेगांव महानगरपालिका हे अंतिम सक्षम प्राधिकरण व लवाद म्हणुन राहतील.

**साहीत्य व सुरक्षा-**

५) निविदेतील काम करणेसाठी आवश्यक असलेली सर्व साधन सामुग्री, उपकरणे,मनुष्यबळ इ.उपलब्ध करणे व त्यासाठी आवश्यक असणारा खर्च उपलब्ध करणेची सर्व जबाबदारी संबंधित मक्तेदाराची राहील.

६) काम करीत असतांना सर्व साधन सामुग्री, उपकरणे,मनुष्यबळ इत्यादीची सुरक्षा व रखरखाव करण्याची सर्व जबाबदारी संबंधित मक्तेदाराची राहील.

७) आपणाकडे असलेल्या नियुक्त कर्मचा-याची नावे देण्यात येऊन शासनाच्या नियमाप्रमाणे किमान वेतन कायदा,अपघाती विमा, ई.पी.एफ. व इतर सर्व वेतन देण्यात यावे व याबाबतचे लेखी शासनाचे पुरावे वेळोवेळी सादर करणेत यावे.

८) सदर कामी मक्तेदाराने नियुक्त केलेला आपला कर्मचारी यांचे नाव,पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक , साधन सामुग्रींची यादी उद्यान विभाग मुख्यालय,प्रभाग निहाय उद्यान निरिक्षक यांचे कार्यालय व अग्निशमन विभाग यांना देण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहिल.

**सर्व साधारण अटी शर्ती -**

१. या निविदा/कोटेशन व्दारे प्राप्त निविदा/कोटेशन पैकी सर्वात जास्त किंमतीचा दर सादर करणारे निविदाकारास सदरचे काम करणेसाठी कार्यादेश देणेकामी विचारात घेण्यात येईल.व इतर सर्व निविदाकारांनी सादर केलेल्या निविदा नाकारण्यात येतील.

२. कोणतीही निविदा कोणत्याही क्षणी कोणतेही पुर्व सुचना न देता नाकारणे तसेच निविदे संबंधी अटी व शर्ती कमी करणे अथवा नविन अट समाविष्ट करणे यासंबंधिचे सर्व अधिकार मा.आयुक्त मालेगाव मनपा यांनी राखुन ठेवलेले आहेत.

३. ज्यांचे निविदा दर मंजुर होतील त्यांनी महानगरपालिकेच्या लाभात अटीशर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करुन दयावा लागेल.

४. 13) मालेगांव महानगरपालिका क्षेत्रातील वादळवाऱ्याने किंवा नैसर्गिक कारणांनी उन्मळुन पडलेली झाडे उचलुन वाहुन नेणे,तसेच रस्त्यातील उभी असलेली धोकेदायक फांदयाचा विस्तार व वाळलेली धोकेदायक किडग्रस्त झाडे तोडणे त्यापासुन मिळालेल्या लाकुड फाटयाचे वजन करणे व ज्या ठिकाणी वजन केले त्या ठिकाणाचे वजनाची पावती स्वाक्षरीसह प्रमाणित करुन उद्यान विभाग,मुख्यालय येथे सादर करणेत यावी.

५. 14) पावसाळी हंगामात वृक्ष उन्मळुन पडण्याच्या घटना मोठया प्रमाणावर होत असतात अश्या वेळी साधारणत:

६. मक्तेदारास कामगारांची नियुक्ती व त्यांची सर्व सोय त्या त्या प्रभागात रात्रीच्या वेळेस ठेवावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

७. वृक्ष तोडतांना किंवा वृक्षाचा विस्तार कमी करतांना अथवा उचलुन वाहुन नेतांना कोणत्याही प्रकारचा उपघात जिवित व वित्तहानी होणार नाही यांची दक्षता घेणे मक्तेदारास बाध्य राहील. व तसे घटीत झाल्यास येणारा सर्व आर्थिक खर्च दावे, तक्रारी इत्यादीचा निपटारा करण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहिल.

८. उचलुन वाहून नेलेल्या लाकूड फाटयापोटी वजना प्रमाणे आपणास मंजुर करण्यात आलेल्या दराप्रमाणे जी रक्कम होईल ती महानगरपालिका खजिन्यात पाच दिवसाच्या आत भरण्यात यावी व त्याची मुळ पावती उद्यान विभाग, मुख्यालय येथे सादर करणे आवश्यक आहे.

९. उन्मळुन पडलेल्या तसेच विकास कामामध्ये अडथळा निर्माण करणा-या वृक्षां मध्ये जसे उंबर, पिंपळ, वड व इतर देशी प्रजातीचे वृक्ष साधारण अडीच ते तीन फुट बुंधा लपेटीचे अशी वृक्षांची आवश्यक तेवढी छाटणी करुन तीत्याच जागेवर पुर्नरोपन करुन दयावे लागतील अथवा मनपाने सुचविलेल्या जागेवर पुर्नरोपन करण्यात यावे.

१०. मालेगांव महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात भविष्यात अपात्कालीन परिस्थितीत वेळी अवेळी वृक्षांची होणारी पडझड तसेच नैसर्गिक कारणांनी उन्मळुन पडलेले वृक्ष अथवा तुटुन पडलेल्या वृक्षाच्या फांद्या तोडून व उचलुन वाहून तात्काळ सुरळित करणेकरिता वेळेचे बंधन न बाळगता तत्परतेने करणे बंधनकारक असेल.

उपायुक्त (मुख्यालय)
मालेगांव महानगरपालिका मालेगांव

Scanned with OKEN Scanner